# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०४ जुलै, २०२४ / आषाढ १३, १९४६ (शके)**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) मृद व जलसंधारण मंत्री**
**(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री**
**(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

### झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील घरे विकण्यासाठी लागणाऱ्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबत

**(१) * २३१२५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या इमारतींमधील घर विकायचे असल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक असल्याचे पत्रक महसूल विभागाने काढले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ना-हरकत प्रमाणपत्र काढण्यासाठी जोडपत्रामध्ये नाव असलेल्या मूळ सभासदाच्या नावाने अर्ज करावा लागतो तसेच सदर मूळ सभासद मृत पावल्यास त्याच्या वारसाच्या नावे अर्ज करावा लागत असल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या इमारतींमधील संबंधित रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्यालयात वारंवार पाठपुरावा करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी प्रक्रिया रद्द करून मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन इमारतींमधील घरे विक्रीची प्रक्रिया सुलभ होण्याकरीता व सदनिका विकण्यासाठी महसूल प्रशासनाकडून घालण्यात आलेली जाचक अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ ई अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत वितरित करण्यात आलेल्या पुनर्वसन सदनिकांच्या हस्तांतरणास सदनिकांचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत प्रतिबंध करण्यात आला आहे. ५ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरही केवळ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीनेच सदनिकांच्या हस्तांतरणाची तरतूद आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांचे खरेदीखत नोंदणी करण्यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे ना-हरकत घेण्यासंबंधी प्राधिकरणातर्फे दिनांक ०४/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांना विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन नोंदणी महानिरीक्षक व नियंत्रक, पुणे यांनी दिनांक ०१/०९/२०२३ च्या पत्रान्वये प्राधिकरणाच्या दिनांक ०४/०८/२०२३ रोजीच्या पत्रानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना नोंदणी उप महानिरीक्षक, मुंबई यांना दिलेल्या आहेत. नोंदणी उप महानिरीक्षक, मुंबई यांनी दिनांक २६/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये याप्रमाणे सर्वांना सूचित केले आहे.

(२) हे खरे नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या सदनिका ह्या झोपडीधारकांचे जीवनमान सुधारण्याच्या उदात्त हेतूने दिलेल्या असतात. त्यांची खरेदी-विक्री करणे हा योजनेचा हेतू नाही. अशा हस्तांतरणासाठी ५ वर्षाची अट व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे.

मूळ झोपडीधारकांचा सदनिका हस्तांतरणाबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदनिका हस्तांतरणाबाबतची प्रक्रिया ही प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१४५, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ नुसार करुन संबंधितांस सदनिका हस्तांतरणाबाबत मूळ लाभार्थी व खरेदीदार यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर हस्तांतरणाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येते. झोपडीधारकांच्या सोईसाठी सदनिका हस्तांतरण कार्यवाही लवकरच ऑनलाईन पध्दतीने करण्याचे प्रयोजन आहे.

(३) पुनर्वसन इमारतीमधील सदनिकांची हस्तांतरण - प्रक्रिया सुलभ करण्याकरीता पुढील उपाययोजना करण्यात आल्या.

१. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विकसित करण्यात आलेल्या निवासी पुनर्वसन सदनिकेचे अनिवासी गाळयाचे विहीत कालावधीनंतर सदनिकाधारकांच्या जवळच्या नात्यात म्हणजेच पती, पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, नात, विधवा सून यांना बक्षिसपत्राद्वारे हस्तांतरण करावयाचे झाल्यास त्यासाठी आकारावयाचे हस्तांतरण शुल्क रुपये २००/-इतके निश्चित करण्यात आले आहे.

२. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्यात आली असून पुनर्वसन सदनिका वाटपानंतर ५ वर्ष पूर्ण झाल्यानंतर सदनिका विक्री करण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

३. गृहनिर्माण विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निवासी सदनिकांच्या हस्तांतरणासाठी आकारण्यात येणारे हस्तांतरण शुल्क रुपये १ लाख वरुन ५० हजार करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण या वीज कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत

**(२) * २३३५२ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अरुण लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.एकनाथराव खडसे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या कंपन्यांमध्ये अंदाजे ४२००० कंत्राटी वीज कामगार मागील २० वर्षांपासून कार्यरत असून भारतीय मजदूर संघाशी संलग्नित विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी यांचेसमवेत माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत राज्यातील कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहीत रोजगार मिळवून देण्यासाठी राज्यात हरियाणा कौशल्य विकास बोर्डाप्रमाणे नवीन यंत्रणा उभारण्याचे आश्वासन मा.उप मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषण या तीनही वीज कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांच्या वेतनात वाढ करावी व रोजंदारी कामगार पध्दतीद्वारे शाश्वत रोजगार या दोन प्रमुख मागण्यांसह इतर अन्य १७ मागण्यांसाठी कंत्राटी कामगारांनी आंदोलन केले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्यांतील कंत्राटी वीज कामगारांच्या संयुक्त कृती समितीने कामगारांच्या विविध मागण्यांसाठी व वीज कंपन्यांमधील कंत्राटदाराकडून होणारी आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी ९५ टक्के कंत्राटी कर्मचारी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजीपासून दोन दिवस, तर दिनांक ५ मार्च, २०२४ रोजीपासून बेमुदत संपावर गेल्याची बाब माहे मार्च-२०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भारतीय मजदूर संघाशी संलग्नित विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी यांचेसमवेत माहे जानेवारी, २०२४ मध्ये झालेल्या बैठकीत कंत्राटी कामगारांना पारेषण व वितरण भरती मध्ये आरक्षण व वीज कंपनीच्या सेवेत भरती करून घेण्यासाठी ४५ वर्षांपर्यंतची वयाची सवलत मिळावी तसेच आयटीआय नसलेले कुशल व अनुभव कमी असलेल्या कामगारांना परत कामावर घ्यावे तसेच न्यायालयीन प्रकरणातील कामगारांना कामावर घेण्याच्या सूचना मा.उप मुख्यमंत्री महोदयांनी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कंत्राटी कामगारांच्या वेतनात वाढ व रोजंदारी कामगार पध्दतीद्वारे शाश्वत रोजगार या दोन प्रमुख मागण्यांसह इतर अन्य १७ मागण्यांची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश यांचे पत्र महाराष्ट्रातील कामगार व विज उद्योगातील कंत्राटी कामगारांसंदर्भात दिनांक ०४ जानेवारी, २०२४ मधील मागण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ जानेवारी, २०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत हरियाणा कंत्राटी कामगारांच्याबाबतीच्या धोरणासंदर्भात चर्चा होऊन त्या धोरणामध्ये कंत्राटी कामगारांना कुठेही कायम करण्याची शाश्वती देण्यात आलेली नाही व हरियाणा सरकारने लागू केलेले कायदे राज्यात अगोदरच लागू असल्याचे बैठकीत अवगत करण्यात आले.

(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समितीने तिन्ही कंपन्यांच्या आस्थापनेवरील बाह्यस्त्रोत कामगाऱ्यांच्या विविध मागण्यांकरीता दिनांक २८ व २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी ४८ तास काम बंद धरणे आंदोलन केले होते.

(३) महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समितीने विविध मागण्यांकरीता दिनांक २८ व दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी पुकारलेल्या ४८ तास काम बंद धरणे आंदोलनामध्ये तसेच दिनांक ०५ मार्च, २०२४ पासून पुकारलेल्या बेमुदत काम बंद धरणे आंदोलनामध्ये काही प्रमाणात बाह्यस्त्रोत कर्मचारी सहभागी झाले होते.

(४) व (५) हे अंशत: खरे आहे. बैठकीत तिन्ही वीज कंपन्यांशी चर्चा करुन पाठपुरावा करण्याच्या सूचना ऊर्जा विभागास दिलेल्या आहेत.

महाराष्ट्र विज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समवेत त्यांच्या मागण्यांविषयी मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९ मार्च, २०२४ रोजी बैठक झाली. यात विविध मागण्या व चर्चा होऊन बैठकीत वस्तुस्थिती अवगत करण्यात आली. झालेल्या सकारात्मक चर्चेच्या अनुषंगाने आंदोलन मागे घेण्यात आले. समितीच्या मागण्यांचे निराकरण होण्याच्या दृष्टीने संचालक (मा.सं.) महावितरण/ महापारेषण, कार्यकारी संचालक (मा.सं.) महानिर्मिती व तिन्ही कंपन्यांचे मुख्य औद्योगिक संबंधित अधिकारी यांच्या समितीचे गठण करुन समिती व कृती समितीतील संघटनांशी चर्चा सुरु आहे.

महावितरण व महापारेषण कंपनीमध्ये काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांना नियमित सेवेतील प्रवेशाचा मार्ग सुकर करण्याकरीता त्यांच्या मागील अनुभवाच्या आधारे त्यांना सरळसेवा भरतीमध्ये प्रतिवर्षे ०२ गुण असे ०५ वर्षाच्या अनुभवासाठी जास्तीत जास्त १० गुण देण्यात येतात.

मा.सर्वोच्च न्यायालयाने वयोमर्यादा वाढविण्याबाबतची (SLP/५१८५/२०१०) याचिका खारीज केलेली आहे.

याशिवाय महावितरण कंपनीने विहित शैक्षणिक अर्हता नसलेल्या कंत्राटी कामगारांना विद्युत सहायक व उपकेंद्र सहाय्यक या पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता (आय.टी.आय) प्राप्त करण्याकरीता ०३ वर्षाचा अवधी दिला आहे. महापारेषण कंपनीमध्ये कोणत्याही कंत्राटी कागारास विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त नसल्यामुळे कमी करण्यात आल्याची बाब निदर्शनास येत नाही.

कंत्राटी कामगारांना मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियमान्वये किमान वेतन कायद्यान्वये वेतन अदा केले जाते. या तिन्ही कंपन्यांमध्ये बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना विविध भत्ते देण्यात येतात.

वीज उद्योगांकरिता किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत स्वतंत्र अनुसूची उद्योग म्हणून किमान वेतन निश्चित करण्याची बाब विचाराधीन आहे. याबाबत कामगार आयुक्तांना प्रस्ताव सादर केला आहे. तिन्ही कंपन्यांमध्ये रोजंदारी कामगार पध्दतीची अंमलबजावणी करणे संयुक्तीक होणार नाही असे कंत्राटी कामगार कृती समिती बैठकीतील चर्चेदरम्यान स्पष्ट करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील संक्रमण शिबीरातील गिरणी कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देण्याबाबत

**(३) * २३६४० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अनेक गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेली संक्रमण शिबीरे धोकादायक स्थितीत असून, काही गिरण्यांच्या जागेवर बांधण्यात आलेल्या चाळी देखील धोकादायक स्थितीत असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संक्रमण शिबीरे व चाळींचा पुनर्विकास करुन तेथील गिरणी कामगारांना तेथेच घरे उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) गिरण्यांच्या जागेवर बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबिरांची व्यवस्था धोकादायक असल्याची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसुन सदर संक्रमण शिबिरे सुस्थितीत असल्याचे म्हाडाने कळविले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत

**(४) * २३४६५ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या इमाव, विजाभज आणि विमाप्र विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २ ऑगस्ट, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आला असून, अद्यापही शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ तसेच २०२२-२०२३ मधील संबंधित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था ही पूर्णतः प्रशिक्षणार्थ्यांकडून मिळत असलेल्या प्रशिक्षण शुल्कातून चालविली जात असून शासनामार्फत कोणत्याही प्रकारचे निधी स्वरूपात अनुदान मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी गांभीर्याने लक्ष देऊन शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ तसेच २०२२-२०२३ च्या इमाव, विजाभज तसेच विमाप्र या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सदर योजना ही राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या इमाव, विजाभज आणि विमाप्र विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्याची योजना असल्याने खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या इमाव, विजाभज आणि विमाप्र विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेसाठी सन २०२१-२२ करीता रुपये १४.४४ कोटी व सन २०२२-२३ करीता रुपये २१.६० कोटी इतकी तरतूद संचालक, इतर मागास बहुजन संचालनालय, पुणे यांना वितरीत करण्यात आली आहे.

सदर तरतूद विजाभज, इमाव, तसेच विमाप्र या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना महाडिबीटी प्रणालीद्वारे वितरीत करण्याकरिता इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयामार्फत महाआयटी कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तथापि, तांत्रिक अडचणींमुळे सदरचा निधी विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यास महाआयटी कडून विलंब झालेला आहे. सद्य:स्थितीत तांत्रिक अडचणी दूर झाल्यामुळे महाआयटी कार्यालयामार्फत महाडिबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यावर निधी जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा अंतर्गत सौर कृषी पंपाच्या शेतकऱ्यांच्या हिश्श्यातील रकमेत वाढ केल्याबाबत

**(५) * २३५२३ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासन अपारंपारिक ऊर्जेतील सौर ऊर्जेला प्रोत्साहन देत असताना सौर कृषी पंपाच्या शेतकऱ्यांच्या हिश्श्यातील रकमेत मागील वर्षापेक्षा सहा हजार ते बारा हजार रुपये वाढ केल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवमं उत्थान महाअभियान अंतर्गत सौर कृषी पंप योजना मागील चार वर्षांपासून राबविण्यात येत असून, योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात प्रथम क्रमांकावर असतानाही शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सौर कृषी पंपाच्या किंमतीत वाढ केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सौर कृषी पंपाच्या शेतकऱ्यांच्या हिश्श्यातील रकमेत झालेली वाढ कमी करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय यांच्या दिनांक २२ जुलै, २०१९ अन्वये प्रसिध्द केलेल्या व वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार देशात प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाअभियान (पीएम कुसुम) ची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर योजनेंतर्गत केंद्र शासन त्यांच्याकडील निर्धारित केलेली सौर कृषी पंपाची आधारभूत किंमत किंवा केंद्र शासनाद्वारे ई-निविदा प्रक्रियाद्वारे क्षमतानिहाय दर व पुरवठादारांची नावे नोंदणीकृत करून राज्यांना कळविते. केंद्र शासनाद्वारे सन २०१९-२०२० व २०२०-२१ मध्ये सौर कृषीपंपांचे क्षमतानिहाय दर निश्चित करण्यात आले होते. तद्नंतर सन २०२३ -२५ साठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे सौर कृषी पंपाचे क्षमतानिहाय दर निश्चित केले आहेत. सन २०१९-२० व २०२०-२१ च्या तुलनेत सन २०२३-२०२५ चे दर यांचे अवलोकन केले असता सन २०२३-२५ साठी निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेले सौर कृषी पंपांचे क्षमतानिहाय दरात वाढ झाल्याचे दिसून येते. त्यामुळे त्याप्रमाणात शेतकऱ्यांच्या हिस्यात वाढ झालेली दिसून येते.
(३) सदर योजनेंतर्गत सौर कृषीपंपाच्या किंमतीच्या ३० टक्के रक्कम केंद्र शासन, ३० टक्के रक्कम राज्य शासन व ४० टक्के रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांनी द्यावयाची होती. तथापि, राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून सर्वसाधारण शेतकरी लाभार्थी हिस्सा १० टक्के, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकरी लाभार्थी हिस्सा ५ टक्के आणि ६० टक्के व ६५ टक्के रक्कम राज्य शासन व अतिरिक्त वीज कराद्वारे भरावी, असा निर्णय घेवून राज्यात दिनांक १२ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील कृषी पंप वीज जोडणीचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे अभियान सुरू करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य पोलीस दलात कंत्राटी कर्मचारी भरती करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(६) * २३५४६ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजहंस सिंह, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य पोलीस दलामध्ये सागरी सुरक्षिततेसाठी असलेल्या पोलीस उपनिरीक्षक (द्वितीय वर्ग) मास्टर, गट ब (अराजपत्रित) आणि पोलीस उपनिरीक्षक (प्रथम वर्ग) इंजिन चालक, गट ब (अराजपत्रित) या संवर्गातील ९५ पदे ११ महिन्यांपर्यंत किंवा नियमित नियुक्तीने कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने भरती करण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्रतिमाह ४० हजार रुपये पगार दिला जाणार असून पोलीस उपनिरीक्षक हे जबाबदारीचे पद असताना नियमित कर्मचारी हे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हाताखाली काम कसे करणार असा प्रश्न निर्माण झाला असून, सदर पदे कंत्राटी पध्दतीने भरती करण्याच्या निर्णयामुळे भरतीच्या परीक्षेत असलेले विद्यार्थी तसेच पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समुद्रातील लुटमारीच्या घटना, तस्करी, दहशतवादी कृत्यांना आळा घालणे आदी कामे सागरी पोलीस करीत असताना कंत्राटी पध्दतीने सदरहू पदे भरण्यात आल्यास सुरक्षा विषयी सर्व गुप्त माहिती खाजगी व्यक्तींच्या हाती लागल्यास सागरी सुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदरहू निर्णयाचा फेरविचार करुन कंत्राटी भरती रद्द करून सागरी सुरक्षेची पदे कायमस्वरूपी भरण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरची नियुक्ती ही कायमस्वरुपी तांत्रिक पदांची भरती होईपर्यंतच तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने करण्यात येत असून त्वरीत तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध व्हावे हा उद्देश आहे. कंत्राटी पध्दतीने भरती केल्याने कोणत्याही अंमलदारांच्या पदोन्नतीवर विपरित परिणाम होणार नाही.
(३) कंत्राटी पध्दतीने तांत्रिक पदे भरती करताना भारतीय नौदल, भारतीय तटरक्षक दल या विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांना प्राधान्य दिले जाते. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या उमेदवारास या पदावरील अधिकाऱ्यास लागू असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक असून नियमांचे उल्लंघन झाल्यास करारनाम्याचा कालावधी संपण्यापुर्वी सेवा समाप्त करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना देण्यात आला आहे. त्यामुळे सागरी सुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता नाही.
(४) राज्यातील सागरी सुरक्षेसाठी वेगवान बोटी चालविण्याकरीता पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) गट-ब (अराजपत्रित) आणि पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन ड्रायव्हर) गट-ब (अराजपत्रित) यांची कायमस्वरुपी सरळसेवा कोटयातील एकूण १६२ रिक्त पदांपैकी ५० टक्के पदे म्हणजेच ८१ रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदरची पदे भरण्याची प्रक्रिया अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाने गिरणी कामगारांच्या घरांसाठी १४ वर्षात सोडतीद्वारे केवळ १५ हजार ८७१ घरेच उपलब्ध करुन दिल्याबाबत

**(७) * २३१४९ श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने गिरणी कामगारांच्या घरांसाठी काढलेल्या चार सोडतीद्वारे मागील १४ वर्षांमध्ये केवळ १५ हजार ८७१ घरे उपलब्ध झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरांच्या निर्मितीचा वेग असाच राहिला तर गिरणी कामगार किंवा त्यांच्या वारसांना घरे मिळण्यासाठी अंदाजे ५० ते ६० वर्षे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गिरणी कामगारांना किंवा त्यांच्या वारसांना लवकरात लवकर घरे मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) गिरणी कामगारांसाठी आतापर्यंत १५८७० घरे उपलब्ध झालेली आहेत.
(२), (३) व (४) सर्व पात्र गिरणी कामगारांना बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली ५८ (१)(ब) अंतर्गत मुंबईतील ५८ गिरण्यांच्या जागेवर घरे बांधण्याकरीता जागा उपलब्ध नसल्याने, मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करून देण्याबाबत मा.मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार दिनांक १५/३/२०२४ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील वीजचोरीचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(८) * २३४९७ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात "रिमोटद्वारे" मीटर चालू-बंद करण्याचे प्रकार निदर्शनास आले असून वीजमीटर "क्लोन" करुन वीजचोरी होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीजचोरीचे वाढते प्रमाण व नवीन प्रकारावर पोलिसांच्या हस्तक्षेपाशिवाय वीजचोरांना पायबंद घालणे अशक्य असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाचा महसूल कमी होत असून वीजचोरी रोखण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मालेगाव तालुक्यातील वीजचोरींचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली असून वीजचोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) वीजचोरी रोखण्याच्या मागणीबाबत शासनास निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(४) मालेगाव वितरण फ्रॅन्चाइझी विभागात मालेगाव वितरण फ्रॅन्चाइझी (मे.एम. पी. एस. एल.) ने वीज गळती रोखण्यासाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती केली असून त्यामार्फत सतत वीजचोरी प्रतिबंध मोहिम

राबविली जात आहे. तसेच महावितरणच्या अखत्यारीत असलेल्या विभागामध्ये वीजचोरी रोखण्यासाठी भरारी पथकामार्फत वीजचोरीच्या जागाचे निरिक्षण करुन कार्यवाही करण्यात येते. तसेच वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांवर वीज अधिनियम, २००३ मधील कलम १३५, १३८ व १२६ नुसार प्रकरणपरत्वे कारवाई करण्यात येते.

माहे एप्रिल, २०२१ ते एप्रिल, २०२४ या कालावधीमध्ये भरारी पथकामार्फत मालेगाव तालुक्यामध्ये एकूण १९० वीजचोरीच्या घटना उघडकीस आणल्या आहेत. तसेच वीजचोरी रक्कम भरणा न केलेल्या एकूण ५१ ग्राहकांवर संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरात दुचाकी वाहनांच्या चोरींच्या प्रमाणात वाढ झाली असल्याबाबत

**(९)** * **२३०९० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील पंचवटी, आडगाव, अंबड आणि नाशिक रोड या पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात दुचाकी, मोटरसायकल चोरीचे प्रमाण वाढले असून सदर पोलीस ठाण्यामध्ये २०० हून अधिक गुन्हे दाखल झाल्याची बाब माहे जानेवारी ते मार्च, २०२४ यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहरात दुचाकी वाहने चोरणारी आंतरराज्य टोळी कार्यरत असल्याची शक्यता नागरिकांनी वर्तविली असून नाशिक शहरातील विविध भागांमध्ये सीसीटीव्हीसह वेगवेगळया यंत्रणा उभारण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक शहरातील वाढती दुचाकी वाहनांची चोरी रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक शहरातील पंचवटी, आडगाव, अंबड आणि नाशिक रोड या पोलीस ठाण्यांमध्ये दुचाकी मोटारसायकल चोरीबाबत माहे जानेवारी २०२४ ते मार्च, २०२४ अखेरपर्यंत ११० गुन्हे दाखल झाली असून त्यातील २२ गुन्हे उघडकीस आली आहेत.

(२) प्रकरणी उघडकीस आलेल्या गुन्ह्यांमध्ये आंतरराज्य टोळी कार्यरत असल्याचे आढळून आलेले नाही. तसेच शहरात विविध भागामध्ये सीसीटीव्हीसह वेगवेगळ्या यंत्रणा उभारण्याबाबत लेखी मागणी प्राप्त नाही. परंतु नाशिक शहर स्मार्ट सिटी योजनेंतर्गत नाशिक महानगरपालिका यांचेमार्फत ८०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

(३) नाशिक शहरात दुचाकी वाहनांच्या चोऱ्या घडू नये म्हणून वाहन पार्कींगच्या ठिकाणी सतर्क गस्त घालणे, कोम्बिंग ऑपरेशन, नाकाबंदी, बीट मार्शल यांची सतर्क पेट्रोलींग, रात्रीच्या वेळी संशयित इसमांची चौकशी, स्टॉप ॲण्ड सर्च मोहिम व्दारे वाहन मालकांची खातरजमा करणे तसेच नागरीकांच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी चौक सभा / अपार्टमेंट सभा घेऊन त्यामध्ये दुचाकी चोरीच्या व इतर घटनांच्या अनुषंगाने सतर्कतेबाबतच्या सुचना देणे अशा उपाययोजना पोलीस प्रशासनामार्फत करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांताक्रुझ (प.) येथील साई दुर्गा को. ऑप.हौ. सोसायटीतील झोपडपट्टीधारकांची विकासकाने फसवणूक केल्याबाबत

**(१०) * २३२६५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ (प.) येथील खोतवाडी झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत बांधण्यात येणाऱ्या साई दुर्गा को.ऑप.हौसिंग सोसायटीतील २५० हून अधिक रहिवाशांचे ट्रान्सकॉन विकासकाने मागील चार वर्षांपासून घरांचे, व्यावसायिक जागांचे भाडे थकविले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी रहिवाशांना राहण्यासाठी प्रथम घरे उपलब्ध करून न देता बांधकाम व्यावसायिक आदित्य केडिया आणि कीर्ती केडिया यांनी विक्रीयोग्य घरांची उभारणी करण्यास प्राधान्य दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत रहिवाशांनी सहायक निबंधक यांच्याकडे अनेक वेळा तक्रार करूनही सदर बांधकाम व्यावसायिकांवर सहायक निबंधक यांनी कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रहिवाशांना व व्यावसायिकांना त्यांचे थकलेले भाडे देऊन ट्रान्सकॉन विकासक यांच्यावर व सदर विकासकाला पाठीशी घालणाऱ्या एसआरए अधिकारी, सहायक निबंधक यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर योजनेतील काही झोपडीधारकांचे भाडे मागणीचा अर्ज झोपुप्रा यांच्या सहकार कक्षाकडे प्राप्त झाला आहे. त्यापैकी श्री.प्रदिप लक्ष्मण सिंग आणि इतर ७६ यांचे अंदाजीत ३ ते ६ वर्षापासून भाडे प्रलंबित असल्याचे दिसून येते. तसेच सचिन वासुदेव नाईक आणि इतर ९ यांचे सन २०१६ पासून भाडे प्रलंबित असल्याचे दिसून येते.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेच्या पुनर्वसन घटकातील सदनिकेचे बांधकाम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रचलित परिपत्रक क्र. १७२ मधील धोरणानुसार सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

सदर पुनर्वसन योजनेतील झोपडीधारकांचे भाडे मागणीचे अर्ज प्राप्त झाल्यावर महाराष्ट्र झोपडपट्टी कायदा (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) चे अधिनियम १९७१ मधील कलम १३ (२) अन्वये कारवाईच्या अनुषंगाने सुनावणी घेण्यात आलेली होती. सदर सुनावणीत दिलेल्या सुचनेनुसार सहायक निबंधक, झोपुप्रा यांनी संबंधित झोपडीधारकांची व विकासकाची एकत्रित सुनावणी घेऊन सुनावणीअंती सहकार कक्षाने दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी भाडे आदेश दिलेले आहेत. त्यानंतरही विकासकाने भाडे जमा केलेले नसल्याने तसेच स्वयंघोषणापत्र सादर न केल्याने दिनांक १७ मे, २०२४ रोजीच्या आदेशान्वये विकासकाच्या विक्री घटकाच्या बांधकामास स्थगिती देण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कळवा (ठाणे), नवी मुंबईसह अन्य भागातील भारनियमन टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(११) * २३०१४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठाणे, कळवा, नवी मुंबई येथे उष्णतेची तीव्र लाट सुरू असताना दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजी दोन-तास वीज पुरवठा खंडित झाल्याने वीजग्राहकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐन उन्हाळयातील सदर भारनियमनासाठी महावितरणकडून सुमारे ५० वर्षांहून अधिक काळ वापरल्या जाणाऱ्या तारांचे जाळे कारणीभूत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ठाणे, कळवा, नवी मुंबईसह राज्यातील भारनियमन टाळण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

महापारेषणच्या ४००/२२० KV कळवा अति उच्चदाब उपकेंद्रामध्ये दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजी दु/०२/२४ वा. सुमारास बिघाड झाल्यामुळे काही भागात वीज पुरवठा खंडीत झालेला होता.तसेच अति उच्चदाब वाहिनीवर क्षमतेपेक्षा जास्त भार झाल्याने महापारेषणच्या राज्य भार नियमन केंद्र, कळवा यांच्या निर्देशानुसार महावितरण कंपनीच्या उपकेंद्रातून निघणाऱ्या वाहिन्यांवर नवी मुंबई विभागात साखळी पध्दतीने आपत्कालीन विद्युत भार नियमन करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

(३) सध्या ठाणे, कळवा, नवी मुंबईसहीत संपूर्ण राज्यात वीजेची मागणी एवढी वीजेची उपलब्धता होत असल्यामुळे सदर भागात कोणत्याही प्रकारचे भारनियमन करण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुलांच्या आरोग्याकरिता हानिकारक असलेल्या फॅटयुक्त पदार्थांवर अतिरिक्त ‘फॅट कंटेट कर’ लागू करण्याबाबत

**(१२) * २२९९९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बर्गर आणि बेकरी उत्पादनांच्या अधिक सेवनामुळे मृत्यूचा धोका वाढत असून दरवर्षी ५ लाख ४० हजार लोकांचा बळी जात असून, मुलांच्या आरोग्याकरीता हानिकारक असलेल्या बर्गर, पिझ्झा, टॅको, डोनटस, पास्ता अशा अतिरिक्त चरबीयुक्त पदार्थांवर १४.५ टक्के इतका अतिरिक्त ‘फॅट कंटेट कर’ लागू करण्याची मागणी ‘अर्ली चाइल्डहुड असोसिएशन’ या पालक-शिक्षक संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ३ मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदरहू निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने अतिरिक्त पदार्थांवर 'फॅट कंटेट कर' लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.
अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले नसल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नाथजोगी, नाथपंथी, डवरी, गोसावी, गोंधळी, जोशी, वासुदेव, बागडी, चित्रकथी, मेंढरी या भटक्या जमातीच्या विविध मागण्यांबाबत

**(१३) * २३८७९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९७३६ ला दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नाथजोगी, नाथपंथी, डवरी, गोसावी, गोंधळी, जोशी, वासुदेव, बागडी, चित्रकथी, मेंढरी या भटक्या समाजाच्या विविध मागण्यांसाठी सर्व जिल्ह्यांच्या मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनामध्ये उपरोक्त जातींचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे तसेच त्यांच्या जात प्रमाणपत्रासाठी सन १९६१ च्या पुराव्यासंदर्भाची अट शिथिल करावी तसेच १९३५ साली केलेली जातनिहाय जनगणना पुन्हा करून सर्व समाजाला लाभ मिळावा अशा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनातील मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन त्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून असे कोणेतेही निवेदन अद्याप शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज योजनेंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती अंतर्गत येणाऱ्या ५१ जाती ४३ उपजातीतील समाजाला तसेच नाथजोगी, नाथपंथी, डवरी, गोसावी व गोंधळी इत्यादी जातींना व उपजातींना महामंडळाच्या प्रादेशिक व जिल्हा कार्यालयामार्फत विविध कर्ज योजनांचा लाभ देण्यात येत आहे.
मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र.१४७६७/१९९३ कुमारी माधुरी पाटील व इतर विरुध्द अति. आयुक्त, आदिवासी विभाग, ठाणे या न्यायालयीन प्रकरणी दिनांक ०२/०९/१९९४ रोजी अंतिम निर्णय देताना मागासवर्गीय जाती जमातींच्या जात प्रमाणपत्र तसेच त्यांची तपासणी करण्याकरीता सर्व राज्यांना पडताळणी समित्यांकरीता मार्गदर्शक तत्वे जारी केलेली आहेत. त्यानुसार, मागासवर्गीय अर्जदारांना संबंधित मानीव दिनांकाचे राज्यातील मूळ अधिवासाचे पुरावे सादर करणे बंधनकारक आहे.

तसेच, जातनिहाय जनगणना या विषयाच्या अनुषंगाने राज्यात करावयाची कार्यवाही ही केंद्र शासनाच्या जनगणना अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार करण्यात येते. यानुषंगाने विधिमंडळाने दिनांक ०८ जानेवारी, २०२० रोजी एकमताने संमत केलेला ठराव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे सामान्य प्रशासन विभागामार्फत उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदमापुर (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील बाळूमामा मंदिराच्या व्यवस्थापनाच्या गैरव्यवहाराबाबत

**(१४) * २३९२२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदमापुर (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील श्री बाळुमामा मंदीर हे भाविकांचे श्रध्दास्थान असून बाळुमामांच्या भाविकांसाठी भक्तनिवास, अन्नछत्र, वाहनतळ इ. सोयी करण्यासाठी मंदिराला लागून असलेली खाजगी ग्रामस्थांची जमीन खरेदी करण्यात येवून जमीन मालकांना रक्कम अदा केल्यानंतर मंदीर व्यवस्थापनाच्या दिवंगत कार्याध्यक्षांनी तीन महिन्यांनी सदर जागेची किंमत ८ कोटी ४७ लाख ६५ हजार इतकी दाखवून उरलेली रुपये ७ कोटी ७३ लाख इतकी रक्कम महाराष्ट्र इंजिनियर्स, मुंबई या कंपनीच्या नावे आरटीजीएसद्वारे अदा केली असल्याची बाब दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रकमेच्या आकड्यात अनावधानाने चूक झाली असल्याचे व पुरवणी खरेदी केल्याचे सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी नमूद केले आहे, परंतु धर्मादाय आयुक्त कार्यालयाने केलेल्या चौकशीत पूर्वीचे दोन्ही मिळकत खरेदी रक्कम शासकीय मुल्यांकनानुसार व बाजारभावानुसारच असल्याचा अभिप्राय दिल्यामुळे या खरेदी व्यवहारात ७ कोटी ७३ लाख १५ हजार इतक्या रकमेचा तसेच मागील दहा वर्षात वाहनांची विक्री इ. प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करण्याच्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

(१) हे अंशत: खरे आहे.

ही बाब दिनांक ३१/१०/२०२३ रोजी निदर्शनास आली नसून, श्री. प्रविण शामराव पाटील व इतर यांनी धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, कोल्हापूर यांना दिनांक ०९/०८/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीमध्ये नमूद केलेली आहे.

सदगुरु श्री.बाळुमामा देवालय, आदमापूर चे तत्कालीन कार्याध्यक्ष श्री. राजाराम बापुसाहेब मगदुम व ग्रामस्थ श्री. दिनकर संतू कांबळे यांनी मौजे आदमापूर, ता. भुदरगड, जिल्हा कोल्हापूर येथील गट नं.३२५ पैकी ०.९५.३० आर क्षेत्राचे दि. २२/०३/२०२१ रोजी मोबदला रक्कम रु.८,४७,६५,०००/- (अक्षरी रूपये आठ कोटी सत्तेचाळीस लाख पासष्ट हजार मात्र) मध्ये नोंदणीकृत पुरवणी खरेदीखत दस्त

क्र.६२५/२०२१ केलेला आहे. सदर दस्तामध्ये "पूर्वी या सदर खरेदी दारांनी खरेदी केलेला नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र.१७३६/२०२० दिनांक १०/१२/२०२० रोजीचे खरेदी खतामध्ये सदर मिळकतीची खुषखरेदी रक्कम रु. ७४,५०,०००/- (अक्षरी रूपये चौ-याहत्तर लाख पन्नास हजार मात्र) इतकी नमूद केलेली होती. परंतु, प्रत्यक्षात सदर मिळकतीची किंमत रु.८,४७,६५,०००/- (अक्षरी रूपये आठ कोटी सत्तेचाळीस लाख पासष्ट हजार मात्र) इतकी ठरलेली होती'', असे नमूद केल्याचे दिसून येते. परंतु, न्यासाचे तत्कालीन कार्याध्यक्ष, श्री. राजाराम बापुसाहेब मगदुम व ग्रामस्थ श्री. दिनकर संतू कांबळे यांचे दरम्यान सदर जमिन मिळकतीची किंमत रु.८,४७,६५,०००/- (अक्षरी रूपये आठ कोटी सत्तेचाळीस लाख पासष्ट हजार मात्र) इतकी ठरलेली होती, हे दर्शविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही.

सदगुरु श्री.बाळुमामा देवालय, आदमापूर यांचे बँक खात्यातून महाराष्ट्र इंजिनियर्स, मुंबई या कंपनीच्या नावे आरटीजीएस द्वारे एकूण रु.८,४७,६५,०००/- (अक्षरी रूपये आठ कोटी सत्तेचाळीस लाख पासष्ट हजार मात्र) इतकी रक्कम वेगवेगळया भागांमध्ये वर्ग केलेली आहे.

(2) हे खरे नाही.

श्री.प्रविण पाटील व इतर यांच्या दिनांक ०९/०८/२०२१ रोजीच्या तक्रारीवरून निरीक्षक चौकशी करण्यात आली. सदर चौकशीच्या अनुषंगाने सहायक धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांनी महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम-४१ डी अन्वये कार्यवाही करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर यांनी कलम-४१ डी प्रमाणे स्वयंखुद्द चौकशी क्र. १/२०२२ मध्ये चौकशी सुरू केली. सदर चौकशी दरम्यान विश्वस्तांना निलंबित केले होते.

धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर यांनी केलेल्या चौकशीत सदगुरु श्री. बाळुमामा देवालय, आदमापूर, जि. कोल्हापूर चे तत्कालीन कार्याध्यक्ष यांनी १३ कोटी रूपये बाजारमुल्य असलेली मिळकत रु.८,४७,६५,०००/- (अक्षरी रूपये आठ कोटी सत्तेचाळीस लाख पासष्ट हजार मात्र) इतक्या किमतीत खरेदी केल्याचा निष्कर्ष काढलेला आहे.

सदगुरु श्री. बाळुमामा देवालय, आदमापूर, जि. कोल्हापूर चे विश्वस्तांनी वाहनांची विक्री करून गैरव्यवहार केल्याचे सिध्द होत नाही, असा निष्कर्ष धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर यांनी स्वयंखुद्द चौकशी क्र.01/2022 मध्ये दिनांक 26/04/2024 रोजी नोंदविलेला आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर यांनी स्वयंखुद्द चौकशी क्र.०१/२०२२ मध्ये दिनांक २६/०४/२०२४ रोजी काढलेल्या निष्कर्षानुसार सदगुरू श्री. बाळुमामा देवालय, आदमापूर, जि. कोल्हापूर चे विश्वस्तांनी जमिन खरेदी व वाहन विक्रीमध्ये कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याने त्यांचेविरूध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(4) लागू नाही.

-----------------

## नेर्ली (ता.कडेगाव, जि.सांगली) परिसरातील गावांकरिता टेंभू योजनेंतर्गत सोडण्यात येणारे पाण्याचे आवर्तन बंद असल्याबाबत

**(१५)** * **२४०४५ श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेर्ली (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील नेर्ली, अपशिंगे, कोतवडे, खंबाळे या गावात टेंभू योजनेचे सोडण्यात येणारे आवर्तन मागील दोन महिन्यांपासून बंद असल्याने गावात पाण्याच्या टंचाईचा प्रश्न निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टेंभू पाण्याचे आवर्तन न सोडल्यास नेर्ली, अपशिंगे, कोतवडे, खंबाळे गावच्या शेतकऱ्यांनी व नागरिकांनी एकत्र येऊन कडेगावच्या मुख्य चौकात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नेर्ली येथील खोऱ्यात जंगल परिसर मोठ्या प्रमाणात असून तेथील ओढे, तलाव, पाणवठे आटल्याने पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्यासाठी तसेच वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी टंचाई निर्माण झाल्याने सागरेश्वर अभयारण्यातील वन्य प्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीत पोहोचू लागले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या परिसरातील वन्य प्राणी व ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी बंद केलेले टेंभू योजनेचे आवर्तन सोडण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

टेंभू उपसा सिंचन योजनेंतर्गत कडेगाव तालुक्यातील एकूण ९३२५ हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली असून, जोड कालवा १, जोड कालवा २ हे मुख्य कालवे व सुरली व कामथी असे एकूण ४ कालवे आहेत. सुरली कालव्याची एकूण लांबी २३ किलोमीटर असून नेर्ली, कोतवडे, अपशिंगे व खंबाळे ही गावे समाविष्ट आहेत. या चारही गावाचे एकूण लाभक्षेत्र ९१८ हे. आहे. या व्यतिरिक्त सुरली कालव्याच्या वरील बाजुस नेर्ली, अपशिंगे, कोतवडे व खंबाळे या गावचे जवळपास ८३४ हेक्टर क्षेत्र हे लाभ क्षेत्राच्या बाहेर आहे. टेंभू उपसा सिंचन योजनेच्या मंजूर प्रकल्प अहवालामध्ये पीक रचनेप्रमाणे ऊस पिकाचा समावेश नाही. टेंभू उपसा सिंचन व्यवस्थापन विभागाने पुरेसे पाणी देऊनसुद्धा लाभ क्षेत्रातील ऊस पीक व पाण्याचा वापर पाहता पाण्याची कमतरता भासते ही वस्तुस्थिती आहे. सन २०२३-२४ या सिंचन वर्षांमध्ये लाभधारकाच्या मागणीप्रमाणे सुरली व कामथी कालव्या करता सिंचनासाठी पाणी देण्यात आले आहे.
(२) नेर्ली, अपशिंगे, कोतवडे व खंबाळे गावच्या लाभधारकांनी पाण्याच्या मागणीकरीता दिनांक २४/०५/२०२४ रोजी उपविभाग अधिकारी, उपविभाग कडेगाव यांना पत्र दिले आहे.
(३), (४) व (५) टेंभू योजनेचे आवर्तन रब्बी व उन्हाळी हंगामात सोडण्यात येऊन सिंचनाकरीता व पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच महसूल खात्यामार्फत आकस्मिक पाणी आरक्षणाअंतर्गत ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे अशा ठिकाणी पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

---------------

## शिंदखेडा व साक्री (जि.धुळे) तसेच नंदुरबार (जि.नंदुरबार) या तालुक्यांमधील अवर्षणग्रस्त भागातील उपसा सिंचन योजना निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१६)** * **२४०७४ श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदखेडा व साक्री (जि.धुळे) तसेच नंदुरबार तालुक्यातील अवर्षणग्रस्त भागातील पिण्यासाठी, शेतीसाठी तापी नदीवरील प्रकाशा बॅरेज मधून हादमोहिदा येथून बुराई नदीत पाणी सोडण्यासाठी तसेच दिनांक २ फेब्रुवारी १९९९ रोजी वा त्यासुमारास शासनाने नदीजोड प्रकल्पांतर्गत योजना मंजूर केली असून, सदर योजना निधीअभावी अपूर्ण असल्याची बाब माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमुळे नंदुरबार तालुक्यातील ३४२९ हेक्टर तसेच सिंदखेडा तालुक्यातील १७८ हेक्टर तर साखरी तालुक्यातील १९४८ हेक्टर क्षेत्र व शेती ओलिताखाली येणार असून केवळ निधी अभावी मागील २५ वर्षापासून सदर योजना प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना कार्यान्वित करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकाशा बुराई उपसा सिंचन योजना ता.जि.नंदुरबार योजनेच्या प्रकल्प अहवालास रुपये ११०.१० कोटी (दरसुची सन १९९७-९८) किंमतीच्या महामंडळाचा निर्णय क्र.तापाविम/कासं/प्रवि-१/प्रमा ६९ सन १९९९, दिनांक ०२/०२/१९९९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.सदर योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता रुपये ७९३.९५ कोटी किंमतीस शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा-२०१९/६३८/(प्र.क्र.२०३/१९)/मप्र, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेली आहे. सदर योजनेची कामे प्रगतीत आहे. सदर योजनेवर माहे मे-२०२४ पर्यंत रुपये ११८.५६ कोटी खर्च झालेला आहे. व सन २०२४-२५ वार्षिक आखणीत रुपये १७.१५ कोटी तरतूद करण्यात आली आहे.सदर योजनेवर नंदुरबार तालुका व शिंदखेडा तालुक्याच्या सिंचन क्षेत्राचा समावेश आहे. तथापि, साक्री तालुक्याचा समावेश नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सदर योजनेवर नंदुरबार तालुक्यातील ४३५१ हेक्टर व शिंदखेडा तालुक्यातील २७३४ हेक्टर असे एकूण ७०८५ हे. क्षेत्र सिंचित होणार आहे. तथापि, साक्री तालुक्याचा त्यात समावेश नाही.

सदर प्रकल्पास दिनांक ०२/०२/१९९९ अन्वये रुपये ११०.१० कोटी किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून निधी अभावी, भूसंपादनाभावी, विविध घटकाचे संकल्पन मंजुरी, वनजमीन संपादनाकरीता लागणारा कालावधी या सर्व बाबीमुळे सदर योजनेची कामे प्रत्यक्ष सुरू होणेस विलंब झाला.

सदर योजनेचे टप्पा क्र.१ मधील उर्ध्वनलिकेचे काम काम ९५% पूर्ण व हाट मोहिदा येथील पंपगृहाचे काम ८० टक्के पूर्ण झालेले आहे. दुसऱ्या टप्प्यातील उर्ध्वनलिकेचे काम ८० टक्के पूर्ण झालेले असून पंपगृहाचे काम २० टक्के पूर्ण झालेले आहे. सदर योजनेचा प्रथम सुप्रमा अहवालास शासन निर्णय

क्रमांक.सुप्रमा-२०१९/६३८/(प्र.क्र.२०३/१९)/मप्र, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर योजनेवर मे-२०२४ अखेर रुपये ११८.५६ कोटी एवढा खर्च झालेला आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षा करीता रुपये १७.१५ कोटी निधीची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आलेली आहे व त्यानुसार पुढील कामे करण्याचे नियोजित आहे.

(३) योजनेच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालास शासन निर्णय क्रमांक.सुप्रमा-२०१९/६३८/(प्र.क्र.२०३/१९)/मप्र, दिनांक १५/०३/२०२४ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने व निधीच्या उपलब्धते नुसार योजनेची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्याला नदीजोड प्रकल्पाचे पाणी मिळण्याबाबत

**(१७) * २४१९२ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १९०५० ला दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथे १५ टीएमसी पाणी क्षमतेच्या नदीजोड प्रकल्पांना मराठवाड्यासाठी पाणीपुरवठा करण्यास गत वर्षी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली असताना, सदर नदीजोड प्रकल्पाचे पाणी मराठवाड्याऐवजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर व वाघाड भागाला देण्यात येणार असल्याचे दिनांक ६ मे, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्याच्या नावाखाली मंजूर केलेल्या या नदीजोड प्रकल्पाच्या अंदाजपत्रकाला शासनाने मंजुरी देऊ नये अशी मागणी मराठवाडा जलसमृध्दी प्रतिष्ठानाने शासनाकडे केली असल्याचे माहे मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नदीजोड प्रकल्पांतर्गत मराठवाड्यासाठी पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

राज्य जलआराखड्यानुसार अतिरिक्त १५.५ टीएमसी पाणी पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातून पुर्वेकडील गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी दमणगंगा-एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व पार गोदावरी हे तीन नदीजोड प्रकल्प प्रस्तावित आहेत.

प्राप्त पाणी उपलब्धता प्रमाणपत्रानुसार वर नमुद दमणगंगा (एकदरे) - गोदावरी (वाघाड) व दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा-देवनदी) या योजनांसाठी अनुक्रमे ३.५५ टीएमसी व ५.६८ टीएमसी पाणी वापर मंजूर आहे.

दमणगंगा (एकदरे) - गोदावरी (वाघाड) नदी जोड प्रकल्प ता.पेठ, जि.नाशिक या योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर योजनेचे ३.५५ टीएमसी पाण्यापैकी ३.३९ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे प्रस्तावित असून उर्वरित ०.१५ टीएमसी पाणी स्थानिक वापरासाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा-देव) नदीजोड प्रकल्प ता.मोखाडा, जि.-पालघर या योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार योजनेच्या एकूण ५.६८ टीएमसी पाण्यापैकी मराठवाड्याकरीता १.४१ टीएमसी पाणी वळविणे प्रस्तावित आहे व सिन्नर भागासाठी सिंचन व बिगर सिंचनासाठी एकूण ३.४७ टीएमसी तसेच उर्वरित पाणी पर्यावरण व बाष्पीभवनासाठी वापरणे नियोजित आहे.

पार गोदावरी योजनेसाठी गोदावरी खोरे जलआराखड्यानुसार ३.४२ टिएमसी पाण्याची तरतूद होती. तथापि, मुख्य अभियंता जलविज्ञान व धरण सुरक्षितता नाशिक यांनी केलेल्या अभ्यासानुसार प्रकल्पस्थळी ७५ % विश्वासार्हतेस १.५९ टिएमसी नक्त पाणी उपलब्ध होत असल्याने योजनेचे पुनर्नियोजन करण्याचे प्रस्तावित आहे.

पार गोदावरी योजनेद्वारे उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी स्थानिक वापर वगळून मराठवाड्यासाठी वापरण्याचे नियोजित आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सदर मागणीबाबत निवेदन विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) दमणगंगा-एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी या नदीजोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांच्याकडुन छाननी होऊन प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्याचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कच्च्या कैद्यांकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(१८) * २३३५७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात सन २०१९ मधील उपलब्ध आकडेवारीनुसार ज्यांच्यावर न्यायालयीन प्रकरणे सुरु झालेली नाही असे २७,५५७ कच्चे कैदी असून, केवळ जामीन भरण्याची रक्कम नसणे, कायद्याचे ज्ञान नसणे, मा.न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची वाढती संख्येमुळे दावा सुरू होण्यास होणारा विलंब यामुळे दिवसेंदिवस या कच्च्या कैद्यांच्या संख्येत वाढ होत असल्याने राज्यातील तुरूंग प्रशासनावरील भार वाढत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कच्च्या कैद्यांना तुरूंगात गुन्हेगारांसोबत ठेवण्यात येत असल्याने हे कच्चे कैदी कालांतराने सराईत गुन्हेगार बनण्याची शक्यता लक्षात घेता सदरहू प्रकरणी कच्च्या कैद्यांकरीता स्वतंत्र बंदीगृह, स्वतंत्र न्यायालये, मोफत कायदेशीर सल्लागाराची मदत इ. उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यातील कारागृहांमध्ये माहे डिसेंबर, २०१९ अखेर २७४२७ कच्चे कैदी होते. दिनांक ३०/०४/२०२४ अखेर त्यांची संख्या ३२३७३ इतकी आहे.

(२) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण विकास महामंडळ, वरळी, मुंबई यांचेमार्फत पुढील नवीन कारागृहांची बांधकामे प्रस्तावित आहेत:- i) मौजे. नारायणडोह, जि.अहमदनगर- ५०० बंदीक्षमता, ii) मौजे उमरोळी, जि.पालघर - १५०० बंदीक्षमता, iii) मौजे वासंबा, जि.हिंगोली-५०० बंदीक्षमता, iv) मौजे

कारंजा, जि.गोंदिया- ५०० बंदीक्षमता, v) मौजे खेडी शिवार ता.भुसावळ- ३४९ बंदी क्षमता, vi) व vii) ठाणे व पुणे येथील कारागृहांच्या अस्तित्वातील जागेवर- प्रत्येकी ३००० बंदीक्षमता.

• गृह विभाग, शासन निर्णय दिनांक १३/०९/२०२३ अन्वये सामाजिकदृष्ट्या वंचित किंवा कमी शिक्षित अथवा कमी उत्पन्न गटातील गरीब बंद्यांना जामिन मिळवून देणे या केंद्र शासनाच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन स्तरावर "देखरेख समिती (Oversight Committee)" व शासन निर्णय दिनांक २७/१२/२०२३ अन्वये जिल्हा स्तरावर "अधिकारप्राप्त समिती (Empowered Committee)" ची स्थापना करण्यात आली आहे. तसेच जिल्हा व विधी सेवा प्राधिकरण यांचेमार्फत कच्च्या कैद्यांना मोफत कायदेशीर सल्ला देण्यात येतो व कारागृहांमधील आर्थिकदृष्ट्या कमकुवत कैद्यांना जामिन मिळवून देणे बाबत कार्यवाही करण्यात येते.

• मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली, सुमोटो याचिका क्र.४०६/२०१३ प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रत्येक कारागृहात UTRC कॅम्पेन आयोजित करण्यात येवून जास्तीत जास्त बंद्यांना जामिन मिळवून देण्याची कार्यवाही करण्यात येते.

• कच्च्या कैद्यांच्या न्यायालयीन प्रकरणांसाठी कारागृहांच्या आवारामध्ये जेलकोर्ट ची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

• जिल्हा व विधी सेवा प्राधिकरण, सामाजिक संस्था, टाटा ट्रस्ट संस्था मुंबई, दर्द से हमदर्द तक संस्था इ.मार्फत कच्च्या कैद्यांना मोफत कायदेविषयक सल्ला देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळिये (ता.महाड, जि.रायगड) दरडग्रस्तांची नवी घरे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(१९) * २३६२९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळिये (ता.महाड, जि.रायगड) येथील दरडग्रस्तांना शासनाने बांधून दिलेली घरे निकृष्ट दर्जाची असून अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत, तसेच रुफिंग शीट फुटली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळीये येथील पाणी पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली नसल्यामुळे पाण्याची समस्या निर्माण झाली आहे तसेच रस्ते, सांडपाणी, संरक्षक भिंत, रस्त्यालगत व उतारावरील भूखंडासाठी स्टोन पिचींगची कामे व बाह्य विद्युत पुरवठा, दिवाबत्ती ही कामे जिल्हा परिषद, रायगड व महावितरण यांच्यामार्फत करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात तळिये गावठाणातील घरांची दुरुस्ती व येथे मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

सदर घरांच्या बांधकाम व बांधकाम दर्जाबाबतची पाहणी व्ही.जे.टी.आय., मुंबई व आय.आय.टी., पवई या संस्थांमार्फत करण्यात आली असून सदर संस्थांनी सदंनिकांच्या बांधकामामध्ये व बांधकाम

दर्जामध्ये कोणत्याही प्रकारचे दोष आढळून आले नसल्याचे अहवाल दिले आहेत. तसेच, लाभार्थ्यांकडूनही अशी कोणतीही तक्रार कोकण मंडळास प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) व (४) म्हाडामार्फत घरे बांधणीचे काम प्रगतीपथावर असून रस्ते, सांडपाणी, पाणीपुरवठा, संरक्षक भिंत, रस्त्यालगत व उतारावरील भूखंडासाठी स्टोन पिचींगची कामे इ.कामे जिल्हा परिषद, रायगड मार्फत व बाहय विद्युत पुरवठा, दिवाबत्ती ही कामे महावितरण यांच्यामार्फत करण्यात येत असून सदर कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

-----------------

## महानिर्मितीचे प्रशासकीय परिपत्रक प्रकल्पबाधित उमेदवारांना लागू करण्याबाबत

**(२०) * २३४७४ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी येथील प्रकल्पबाधित गावातील उमेदवारांना प्रशिक्षण योजनेंतर्गत महानिर्मितीच्या प्रशासकीय परिपत्रक क्र.३८८, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ नुसार प्रशिक्षणार्थ्यांना मुल्यमापनानंतर दरवर्षी ५ गुण देण्यात येतील, कमाल गुणांची मर्यादा २५ ठेवण्यात आली असून महानिर्मिती कंपनीची ज्यावेळेस सरळसेवेची तंत्रज्ञ-३ पदाची जाहिरात येईल त्यावेळेस सदर गुण विचारात घेण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानिर्मिती कंपनीमार्फत सरळसेवेची तंत्रज्ञ-३ पदाची जाहिरात आल्यास सदर प्रशिक्षणार्थ्यांचे २५ गुण तयार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोराडी सारखी औष्णिक विद्युत केंद्रे राज्यात अनेक ठिकाणी असून केवळ कोराडी प्रकल्पबाधितांसाठीच सदर परिपत्रक काढण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर परिपत्रकामुळे निवडक प्रशिक्षणार्थ्यांना लाभ होणार असल्यामुळे इतर ठिकाणच्या प्रकल्पबाधितांवर अन्याय होत असल्याने तीव्र असंतोष पसरला असून कोराडी प्रकल्पबाधितांप्रमाणे इतर प्रकल्पबाधित प्रशिक्षणार्थ्यांना उक्त परिपत्रक लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे. महानिर्मिती कंपनी औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी येथे ३x६६० मे.वॅट क्षमतेचे युनिट क्र.८,९ व १० अनुक्रमे दिनांक १६/१२/२०१५, दिनांक २२/११/२०१६ व दिनांक १७/०१/२०१७ रोजी कार्यान्वित होऊन ऊर्जा निर्मिती सुरु करण्यात आली होती. वरील प्रकल्पांना केंद्रीय पर्यावरण व वन विभागाने नाहरकत प्रमाणपत्र देताना सामाजिक उत्तर दायित्व जबाबदारी (CSR) अंतर्गत विद्युत प्रकल्पाच्या प्रदुषणाने बाधित गरीब व होतकरु युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक विकास घडवून आणण्याकरीता कार्यक्रम आखण्याबाबत निर्देशित केले होते. सदरील अटीच्या अनुषंगाने कोराडी व सभोवतालच्या ५ कि.मी. परिसरातील कोराडी विद्युत प्रकल्पाच्या प्रदुषणाने बाधित गरीब व होतकरु युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक विकास घडवून आणण्याकरीता कोराडी औष्णिक विद्युत प्रकल्प येथे आय. टी. आय. अर्हताधारक उमेदवारांना प्रशिक्षण

देण्याचे कार्यक्रम तसेच तंत्रज्ञ-३ पदाच्या सरळसेवा भरतीवेळी प्रशिक्षणाचे प्रत्येक ०१ वर्ष पूर्ण झाल्यानंतर दरवर्षी ०५ गुण असे कमाल २५ गुण देण्याबाबत महानिर्मितीद्वारा प्रशासकीय परिपत्रक क्र.३८८, दिनांक १९/०८/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. तसेच सदरील प्रशासकीय परिपत्रकानुसार महानिर्मिती जाहिरात क्र. ०४/२०१९ अन्वये तंत्रज्ञ-३ पदाच्या सरळसेवा भरतीत उमेदवारांना वरील परिपत्रकाचा लाभ देण्यात आला आहे.

(२) अंशतः खरे आहे. महानिर्मिती कंपनीमार्फत तंत्रज्ञ-३ पदाची जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार असल्याबाबतची सूचना दिनांक १४/०३/२०२४ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरील जाहिरातीवेळी संबंधित प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण पूर्ण केल्याचे वर्षनिहाय गुण देण्यात येतील.

(३) व (४) प्रश्न क्र. ०१ मधील उत्तरातील खुलाश्यानुसार कोराडी युनिट ८,९ व १० प्रकल्पाला केंद्रीय पर्यावरण व वन विभागाने नाहरकत प्रमाणपत्र देताना घातलेल्या अटींच्या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र.३८८ दिनांक १९/०८/२०१७ नुसार कोराडी येथील प्रकल्पबाधित गावातील प्रकल्पबाधीतांना सामाजिक उत्तरदायित्व योजनेतंर्गत लाभ देण्यात येतो.

तसेच सदरील प्रश्नामध्ये नमूद केलेल्या मुद्यांप्रमाणे सामाजिक उत्तरदायित्व योजना (CSR) लागू करताना नविन संचासाठी केंद्रीय पर्यावरण खाते व त्याप्रमाणे इतर सक्षम प्राधिकारणे यांचे निर्देश, संचाचे आर्युमान तसेच महानिर्मिती कंपनीच्या आवश्यकतेच्या अधीन राहून योजना पारीत करण्यात येतात. त्यानुषंगाने महानिर्मिती कंपनीने कोराडी औ.वि.केंद्र यांच्या धर्तीवर भुसावळ येथील १x६६० मे.वॅ. प्रकल्पाच्या नविन संचाच्या अनुषंगाने प्रकल्पबाधितांना प्रशासकीय परिपत्रक क्र.५२८ दिनांक २२/०८/२०२३ अन्वये सामाजिक उत्तरदायित्व योजना लागू केली आहे. यापूर्वी सुरु करण्यात आलेल्या प्रकल्प/विद्युत केंद्रांना नाहरकत प्रमाणपत्र देताना केंद्रीय पर्यावरण व वन विभागाने अशाप्रकारची अट न घातल्याने, सदरील योजना इतर प्रकल्प/ विद्युत केंद्र येथे सुरु करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सहवीज निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२१)** * **२३५२४ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहवीज निर्मिती या योजनेकडे दुर्लक्ष होत असून सन २०२० मध्ये सहवीज निर्मितीचे पहिले धोरण जाहीर केल्यानुसार २०२५ पर्यंत १३५० मेगावॅट सहवीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असतानाही प्रत्यक्षात ३५० मेगावॅट सहवीज खरेदी करार करण्यात आले असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात २७० मेगावॅट वीजेची खरेदी झाल्यामुळे सहवीज निर्मितीचे धोरण प्रलंबित असून, शासनाने सन २०२५ पर्यंत राज्यात १३५० मेगावॅट सहवीज निर्मितीचे ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले नसल्यामुळे साखर कारखान्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सहवीज निर्मितीचे १३५० मेगावॅटचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्य शासनाने अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२०, दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी जाहीर केले असून, या धोरणातंर्गत सहवीज निर्मिती प्रकल्पांसाठी १३५० मेगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या धोरणानुसार महावितरण कंपनीने मार्च, २०२४ पर्यंत एकूण ४३० मेगावॅट क्षमतेच्या ऊसाच्या चिपाडावर आधारीत सहवीज निर्मिती प्रकल्पांसोबत वीज खरेदी करार करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही. सन २०२० च्या अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरणामध्ये ऊसाच्या चिपाडावर आधारीत सहवीज निर्मिती प्रकल्पांचा देखिल समावेश आहे. शासन निर्णय, दिनांक ३० जून, २०२२ अन्वये अपाऊ धोरणान्वये निश्चित केलेले उद्दिष्ट सन २०२७ पर्यंत साध्य करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) अपाऊ धोरण-२०२० अंतर्गत सहवीज निर्मिती प्रकल्पांसाठी निश्चित केलेले १३५० मेगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने महाऊर्जामार्फत सदर प्रकल्पांची नोंदणी जलद गतीने होण्याकरीता "सिंगल विंडो पोर्टल" ची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच, सदरचे उद्दिष्ट पूर्ण होण्याकरीता सहवीज निर्मिती प्रकल्पातील निर्मित वीजेचा स्वयंवापर केल्यास प्रकल्पांना प्रकल्प कार्यान्वित केल्याच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षाकरीता विद्युत शुल्क माफी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीच्या मल्टी मीटर बॉक्स खरेदी प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) * २३३४९ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीचे तत्कालीन संचालक (संचलन) यांनी पदाचा दुरुपयोग करुन सन २०२१ मध्ये मल्टी मीटर बॉक्स खरेदीत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात सदरहू मीटर बॉक्सची किंमत प्रत्येकी रुपये ८,००० असतानाही रुपये १४,००० प्रती मल्टी मीटर बॉक्स दराने एकूण ६४,००० मल्टी मीटर बॉक्स खरेदी करण्यासाठी जयपूर येथील आर.एम.सी. स्वीच गिअर कंपनीची निविदा नियमबाह्यरित्या मंजूर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निविदा प्रक्रियेत करण्यात आलेल्या अनियमिततेमुळे आणि भ्रष्टाचारामुळे महावितरण कंपनीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित संचालक यांनी यापूर्वी देखील नियमांचे उल्लंघन करुन महावितरण कंपनीच्या विविध कामांमध्ये हेतूपूरस्परपणे अनियमितता केल्याच्या असंख्य तक्रारी महावितरणाकडे प्राप्त झाल्या असूनही त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याऐवजी त्यांना अधीक्षक अभियंता पदी पदोन्नती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीच्या मीटर बॉक्स खरेदी प्रक्रियेत गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर मल्टी मीटर बॉक्सचा महावितरणच्या Cost Data २०१९-२० प्रमाणे अंदाजीत दर हा रुपये १३,९५१.१४ (वस्तु व सेवाकर सहित) इतका असून सदर निविदेत लघुत्तम दर (L-१ Rate) प्रति बॉक्स रुपये १२,९८६.९९७ इतका आहे.

(३) सदर निविदेअंतर्गत एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या. दर निविदेनुसार मे. आर.एम.सी. स्वीच गिअर लि. जयपूर या कंपनीकडून लघुत्तम दर प्राप्त झाले. सदर दर अंदाजित केलेल्या दरापेक्षा ६.९१% नी कमी आहे. सदर प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे खरेदी धोरण व केंद्रीय दक्षता विभागाच्या मार्गदर्शक तत्वाच्या अधीन राहून राबविण्यात आली असून कोणतीही अनियमितता झालेली नाही. त्यामुळे महावितरण कंपनीचे नुकसान झाले असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

(४) हे खरे नाही.

महावितरण कंपनीने पदोन्नतीकरीता विहित केलेल्या निवड समितीने संबंधित संचालक यांना अधीक्षक अभियंता पदी पदोन्नती देतांना सेवाविनियमातील तरतुदी व शिस्तभंग कारवाईच्या प्रकरणाचा विचार करुनच पदोन्नती दिली आहे. महावितरण कंपनीकडे कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्यास व त्या तक्रारीत तथ्य आढळल्यास कंपनीच्या सेवाविनियमातील तरतुदीनुसार संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत योग्य ती कारवाई करण्यात येते.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी प्रस्तावित असलेला किकवी पेयजल प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(२३) * २२९७० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील औद्योगिकरण व महाविद्यालयांची संख्या वाढत असल्याने शहरातील लोकसंख्येच्या प्रमाणातही वाढ झाली असून, वाढत्या लोकसंख्येची तहान भागविण्यासाठी मागील चार वर्षात पाण्याची आवश्यकता ४.९ टीएमसी वरून ५.६ टीएमसी वाढली असून, नाशिक शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी प्रस्तावित असलेला किकवी नदीवरील प्रकल्प गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन देण्यास ९ गावातील शेतकऱ्यांनी तयारी दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे तसेच उक्त प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी व प्रकल्पाची जमीन संपादित करून शेतकऱ्यांना वाढीव दराने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

नाशिक शहरासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणाचा गाळामुळे कमी झालेला पाणीसाठा पुनर्स्थापित करण्यासाठी तसेच शहरातील लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणामुळे किकवी नदीवरील किकवी पेयजल प्रकल्प हा ४५.८२२ द.ल.घ.मी. पाणीपुरवठा करण्यासाठी प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाची

निविदा क्र. ब-१/ईडी/१४ ही सन २०१४-१५ मध्ये निश्चित करण्यात आलेली होती. तथापि, सदरची निविदा शासन निर्णय, क्र. एसीबी-२०१६/प्र.क्र.१२५/१६/ खारभूमी मंत्रालय, मुंबई दिनांक २३/०९/२०१६ अन्वये विखंडीत करण्यात आली होती. निविदा विखंडन व त्यानंतर मा.उच्च न्यायालयात न्यायालयीन प्रकरणामुळे सदरचे काम प्रलंबित आहे. परंतु, सद्य:स्थितीत प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याची प्रक्रिया क्षेत्रिय स्तरावर तसेच मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार निविदा पुनर्जिवित करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर प्रगतीत आहे.

(२) किकवी पेयजल प्रकल्पासाठी एकूण १० गावातील क्षेत्र संपादित होत असून काही शेतकऱ्यांची सहमती घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. एकूण आवश्यक असणाऱ्या १० गावांच्या एकूण ८८०.०५३३ हे. पैकी ७०७.५८५ हे. चे सरळ खरेदी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास माहे १२/२०२३ पर्यंत सादर करण्यात आले आहेत. त्यानुसार ७ गावांच्या ३५० हे. क्षेत्रासाठी जाहीर नोटीस उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) यांच्यामार्फत प्रसारीत करण्यात आल्या असून उर्वरीत ३ गावांची जाहीर नोटीस प्रसारीत करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) किकवी पेयजल प्रकल्प सन २०२९ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित असून प्रकल्पासाठी आवश्यक जमिनी ह्या शासनाच्या भुसंपादन कायदा २०१३ नुसार सरळ खरेदीने भुसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच सद्य:स्थितीत किकवी पेयजल प्रकल्पाची विखंडीत केलेली निविदा पुनर्जिवित करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील खारभूमी योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२४)** * **२३२५० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील उरण, पेण, अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यांमध्ये खार भूमीच्या एकूण १५६ योजना राबविल्या जात असून यामध्ये २२ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र समुद्राच्या पाण्यापासून संरक्षित होणे आवश्यक होते मात्र तसे न झाल्याने अलिबाग तालुक्यातील बहिरीचा पाडा, मानकुळे, धेरंड, शहापूर आदी गावे समुद्र गिळंकृत करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यातील खारभूमी योजनेची कामे मागील ३० वर्षांपासून प्रलंबित असल्यामुळे समुद्राचे पाणी शेतामध्ये शिरल्याने येथील शेतीचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खारेपाट विभागात समुद्राचे पाणी शिरल्याने येथील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर निधी मंजूर करून कामाचे कार्यादेश माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यासुमारास देण्यात आले असतानाही केवळ ३००० मीटर पर्यंतचे काम करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निधीपैकी ४ कोटी ४४ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असून सदर योजनेंतर्गत अपूर्ण अवस्थेत असलेले ५.५ कि.मी.चा बंधारा व ५ उघाडे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

बृहत आराखड्यानुसार रायगड जिल्ह्यात १६५ योजना राबविण्यात येत असून यामुळे २२,५५९ हेक्टर क्षेत्र संरक्षित करण्याचे नियोजित आहे. या १६५ योजनांपैकी मार्च-२०२४ अखेर १३६ खारभूमी योजना पूर्ण झाल्या असून २०,१२७ हेक्टर क्षेत्र पुन:प्रापित झाले आहे. या योजनांपैकी अलिबाग तालुक्यात ३६ खारभूमी योजना असून सर्व योजना पूर्ण झाल्या आहेत. या योजनांपैकी बहुतांश योजनांचे नुतनीकरण होऊन १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. अतिवृष्टी, येणारी वादळे व मोठी उधाणे यामुळे या योजना कमकुवत झाल्या असून या योजनांना खांडी जात आहेत.

तातडीची उपाययोजना म्हणून निधी उपलब्धतेनुसार तातडीने दुरूस्तीची कामे हाती घेऊन भरतीचे पाणी लाभक्षेत्रात तसेच गावात घुसणार नाही व क्षेत्र बाधित होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून निधीच्या उपलब्धतेनुसार अलिबाग तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या खारभूमी योजनांच्या नुतनीकरणाची कामे हाती घेण्यात येत आहेत.

(३) हे खरे आहे.

अलिबाग तालुक्यातील मानकुळे-सोनकोठा हाशिवरे या खारभूमी योजनेच्या नुतनीकरणाचे कार्यारंभ आदेश फेब्रुवारी, २०२० मध्ये दिले आहेत. त्यानुसार सदर बांधाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर योजनेच्या एकूण ८६७० मी. लांबीपैकी ३७३० मी. लांबीचे बांधाचे मातीकाम पूर्ण झाले आहे.

(४) सदर कामासाठी माहे मार्च, २०२४ अखेर रूपये ७७८.४४ लक्ष इतका खर्च झाला आहे. परंतु पुढील बांधास अनेक खांडी असल्याने प्रशासकीय मान्यतेच्या निधीमध्ये काम पूर्ण होणे शक्य नसल्याने सदर योजनेच्या अंदाजपत्रकास कार्यक्षेत्रावरील निकडीनुसार आवश्यक बाबी समाविष्ट असलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास दिनांक १८ ऑक्टोबर २०२३ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मूळ निविदा अंतिम करुन वाढीव परिमाणांचे काम करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. सबब, उर्वरीत ४९४० मी. लांबीच्या बंधाऱ्याचे व आवश्यक ५ उघाड्यांचे काम जून, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील दूधगंगा धरणातील गळती रोखणेबाबत

**(२५) * २३४१० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील दूधगंगा धरणातील गळती काढण्याचे ८० कोटी रकमेचे काम पुणे येथील एका अनुभव नसलेल्या कंपनीला देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीकडून काम करून घेतल्यास धरणाची गळती कायमस्वरूपी थांबणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने सदरील काम अनुभवी कंपनीला देऊन या धरणाची कायमस्वरूपी गळती थांबविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

दूधगंगा मोठ्या प्रकल्पाच्या गळती प्रतिबंधक उपाय योजनेच्या कामाची रूपये ६२.४८ कोटी किंमतीची निविदा कार्यवाही ही जलसंपदा विभागाच्या दिनांक १८/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक १८/१०/२०२३ मध्ये नमूद मार्गदर्शक सूचनांनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करून सदर काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील “सौभाग्य” योजनेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२६) * २४१९८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या माध्यमातून ‘हर घर बिजली’ या घोषवाक्यानुसार राज्यात २०१८-२०१९ या कालावधीमध्ये घराघरामध्ये वीज पोहचवावी या उद्देशाने पालघर जिल्ह्यात पालघर व वसई मंडळात पालघर, वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, तलासरी व इतर गावांत “सौभाग्य योजना” राबविण्यात आली असल्याचे माहे मार्च,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाईफ इलेक्ट्रिकल, श्री.विठ्ठल इलेक्ट्रिकल, धनंजय इलेक्ट्रिकल, मातोश्री इलेक्ट्रिकल, मिस्बहा इलेक्ट्रिकल, साईदत्त सर्व्हिसेस, सदगुरु इलेक्ट्रो पॉवर, श्री स्वामी समर्थ इलेक्ट्रिकल, श्री जयेश्वर इलेक्ट्रिकल या एजन्सींनी काही ठिकाणी काम न करता देयके मंजूर करुन घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांमध्ये पोल, केबल हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे वापरण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी १० टक्के रिटेंशन ठेकेदारांना देण्यांत येणार नाही असे कंत्राटदारांना पत्राद्वारे कळविले होते मात्र त्यानंतर अधीक्षक व कार्यकारी अभियंता यांनी सदर १० टक्के देयके मंजूर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामांमध्ये निकृ ष्ट दर्जाचे पोल, केबल वापरणारे ठेकेदार व काम न करता देयके मंजूर केलेले अधीक्षक व कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या माध्यमातून “हर घर बिजली” या घोषवाक्यानुसार राज्यात २०१८-२०१९ या कालावधीमध्ये सौभाग्य योजना घरामध्ये वीज पोहचवावी या उद्देशाने पालघर जिल्ह्यातील पालघर मंडळात जव्हार, मोखाडा, विक्रमगड, तलासरी, डहाणू व पालघर तालुक्यात राबविण्यात आली होती. तसेच वसई मंडळात वाडा तालुक्यात ही योजना राबविण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

उल्लेखीत एजन्सींना काही ठिकाणी काम न करता देयके मंजूर करुन घेतली असा कुठलाही प्रकार पालघर मंडळात आढळून आला नाही. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर आरईसी मार्फत त्यांचे थर्ड पार्टी इन्सपेक्शन करण्यात आले होते. "साक्ष पोर्टल" वर आरईसी व्दारे काढण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता सदर पोर्टल वर फोटो अपलोड करुन करण्यात आलेली आहे. तर या एजन्सींना वसई मंडळाअंतर्गत कोणतेही काम देण्यात आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

सदर कामांमध्ये वापरण्यात आलेले साहित्य, पोल, केबल हे कंपनीने प्राधिकृत करण्यात आलेल्या सूचीबध्द पुरवठा धारकांच्या कडून खरेदी करण्यात येते व खरेदी करताना सदर पुरवठाधारक कंपनीमध्ये महावितरण अधिकाऱ्यांचे मार्फत साहित्याची गुणवत्ता व चाचणी करुनच सदर साहित्य वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. सदर तक्रारी पालघर मंडळात प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सर्व उपविभागीय कार्यालयांना कामाची पूर्तता झाल्यानंतरच १०% रिटेंशन परतावा करीता प्रस्ताव सादर करण्यात यावा अशा सुचना देण्यात आल्या होत्या. तद्नंतर उपविभागीय कार्यालयांतर्फे कामात कुठलीही त्रुटी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर १० % रिटेंशन रक्कमेचा परतावा करण्यात आलेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामांबाबत

**(२७)** * **२४०८५ श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द (ता.पवनी, जि.भंडारा) प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे काम ४० वर्षांपासून प्रलंबित असल्याने पवनी तालुका बारमाही सिंचन पासून वंचित असून तेथील शेतकऱ्यांना पाणी मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोसीखुर्द प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे अपूर्ण काम पूर्ण करून शेतकऱ्यांना बारमाही सिंचन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

गोसीखुर्द डाव्या कालव्याचे प्रत्यक्ष बांधकामास वर्ष १९९५ पासून सुरवात झालेली असून आतापर्यंत मुख्य कालवा व शाखा कालव्याचे काम १०० टक्के, वितरिका ९० टक्के व लघु कालव्याची कामे ८५ टक्के पूर्ण झालेली आहेत. मुख्य कालव्याचे अस्तरीकरण पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे. वर्ष २०१४-१५ पासून शेतकऱ्यांना खरीप हंगामात सिंचनासाठी पाणी देणे सुरू आहे. डावा कालवा अंतर्गत एकूण ३१५७७ हे. सिंचन क्षमतेपैकी मे-२०२४ अखेर एकूण २७५८५ हे. सिंचन क्षमता निर्माण झालेली असून, त्यापैकी सन २०२३-२०२४ मध्ये एकूण २६३०० हेक्टर क्षेत्रास प्रत्यक्ष सिंचन करण्यात आले आहे. निर्मित सिंचन क्षमतेमध्ये शेतकऱ्यांना खरीप हंगामात सिंचनाकरीता पाणी देणे सुरू आहे.

(२) विविध अडचणीमुळे सरळ खरेदीने करावयाचे भुसंपादन अपेक्षित गतीने पूर्ण होवू न शकल्यामुळे, कालव्याची कामे विहित कालावधीत पूर्ण होवू शकली नाही. परंतु सद्य:स्थितीत भुसंपादन कायद्यान्वये सक्तीचे भुसंपादन अंतर्गत महसूल विभागाकडून जवळपास ९९ टक्के भुसंपादन पूर्ण झालेले असून जून, २०२५ पर्यंत डावा कालव्या अंतर्गत संपूर्ण वितरण प्रणालीची कामे पूर्ण करणे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सायन (मुंबई) येथील अनाथाश्रमात देणगीचा अपहार केल्याबाबत

**(२८) * २३६३७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन (मुंबई) येथील श्री.मानव सेवा संघ या अनाथाश्रम संस्थेचे रोखपाल यांनी देणगीतील ३६ लाख रुपयांचा अपहार केला असल्याची बाब माहे मार्च,२०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संस्थेच्या विश्वस्तांनी यासंदर्भात सायन पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी श्री मानव सेवा संघ अनाथाश्रम, मुंबई या संस्थेचे विश्वस्थ श्री.प्रणव तेजुकाया यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शीव पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र.९३/२०२४, कलम ४०८ भादंवि अन्वये, दिनांक १६/०३/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपीस दिनांक १३/०५/२०२४ रोजी सी.आर.पी.सी. ४१ (१)(अ) अन्वये नोटीस देऊन चौकशीकामी शीव पोलीस ठाणेस हजर राहणेबाबत कळविण्यात आले होते. सदर गुन्ह्याचा तपास पोलीसांमार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील बीअर शॉपीमध्ये नियमांना डावलून मद्यपींना बसण्याची व्यवस्था केल्याबाबत

**(२९) * २३४७६ श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील बिअर शॉपीमध्ये नियमाला डावलून मद्यपींना बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून सदर प्रकरणाकडे चंद्रपूर जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी यांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बिअर शॉपी सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत सुरू असून जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या बारला पार्किंग नसल्यामुळे बरीचशी वाहने रस्त्यांवर उभी असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच विद्यार्थी वर्गाला वाहतूक कोंडीचा नाहक त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील नियमाला डावलून सुरु असलेल्या बिअर शॉपीकडे दुर्लक्ष करणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच मद्य विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) हे खरे नाही.

एप्रिल, २०२४ मध्ये अशी कोणतीही तक्रार अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही. परंतु यापूर्वी सन २०२३-२४ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील बिअर शॉपीत मद्यपींना बसण्याची व्यवस्था असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याअनुषंगाने क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत तपासणी करून एकूण ५ बिअर शॉपी अनुज्ञप्तीवर नियमभंग प्रकरणे नोंदविण्यात आली होती. त्यामधील ४ अनुज्ञप्तीवर दंडात्मक कारवाई करून रू ३२,०००/- इतका दंड शासन जमा करण्यात आला आहे व १ अनुज्ञप्ती ७ दिवसांकरीता निलंबित करण्यात आली आहे.
(२) चंद्रपूर जिल्ह्यात संबंधित अनुज्ञप्ती विहित वेळेत व्यवहार करतात. विहित वेळेचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीवर वेळोवेळी नियमभंगाची कार्यवाही करण्यात आली आहे. बिअर शॉपी अनुज्ञप्ती मधून सिलबंद बाटलीतून बिअर विक्री करण्यात येते. अशा ठिकाणी बसून पिणे अनुज्ञेय नसते. अशा अनुज्ञप्तीमुळे परिसरात पार्किंगमुळे वाहतूक कोंडी झाल्याबाबतची तक्रार अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर कार्यालयास प्राप्त झालली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) येथील नगरसेवकाच्या हत्येप्रकरणातील मुख्य आरोपी फरार असल्याबाबत

**(३०)*२३३४० श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक २१३८६ ला दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) जत (जि.सांगली) नगरपरिषदेच्या नगरसेवकाची दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी गोळया झाडून व डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या करण्यात आली असून, सदरहू घटनेला ११ महिन्यांचा कालावधी होऊनही हत्येप्रकरणी मुख्य आरोपीस पोलिसांनी अद्यापही अटक केली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू हत्याप्रकरणातील मुख्य आरोपीस अटक करणेकरीता पोलीस प्रशासनाकडून कोणतेही प्रयत्न होत नसून याउलट उक्त आरोपीस मदत करण्याचे काम पोलिसांकडून होत असल्याचे निदर्शनास आले असल्याने याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान

शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, फरार आरोपीस अटक होणेबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर, परिक्षेत्र कोल्हापूर व जिल्हा पोलीस अधीक्षक, सांगली यांना अनेकवेळा भेटून, लेखी निवेदने देऊनही आरोपीस अटक करण्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आरोपीस त्वरीत अटक व्हावी याकरीता विक्रम शिवाजी ताड यांनी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी आमरण उपोषण केले असून आरोपी मोकाट असल्यामुळे माझ्या संपूर्ण कुटुंबाच्या जीवितास धोका असल्याची तक्रार शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी मुख्य आरोपीस माहे एप्रिल, २०२४ पर्यंत अटक करण्यात आली नव्हती. तदनंतर आरोपीने दिनांक २९ मे, २०२४ रोजी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, सांगली येथे आत्मसमर्पण केले आहे. पोलीसांनी मा.न्यायालयाकडून आरोपीचा ताबा मिळवला असून आरोपी पोलीस कोठडीत आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सदर घटनेतील फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे खास पथके तयार करुन राज्यात आरोपीच्या राहत्या घरी, परिसरात, नातेवाईकांच्या घरी, वावर असेल त्या ठिकाणी तसेच परराज्यात विविध ठिकाणी त्यांचा शोध घेण्यात आला. या व्यतिरिक्त राज्यात सर्व पोलीस घटकांकडे आरोपीचा तपास होण्यासाठी तपास याद्या पाठविण्यात आल्या. याबाबत मा.प्रथम वर्ग न्यायालय, जत यांच्याकडून सी.आर.पी.सी. कलम ७३ अन्वये "स्टँडींग वॉरंट" प्राप्त करुन घेण्यात आला. मा.न्यायालयाने आरोपीविरुध्द सी.आर.पी.सी. कलम ८२ प्रमाणे जाहीरनामा काढल्यानंतरही आरोपी हजर होत नसल्याने त्यास फरार घोषीत करण्यात आले. तरी, सदर प्रकरणी आरोपी अटकेबाबत पोलीस प्रशासनाकडून आरोपीस मदत करण्याचे काम केले नाही.
(४) होय, हे खरे आहे.

प्रकरणी गुन्ह्यातील फरार मुख्य आरोपी शोध घेण्याबाबत करत असलेल्या प्रयत्नांबाबत व गुन्ह्याच्या तपासाच्या प्रगतीबाबत उपोषणकर्त्यास अवगत केले असता त्यांनी उपोषण स्थगित केले.
(५) उपप्रश्न क्र.१ ते ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील नद्यांमधील गाळ काढण्याबाबत

**(३१)** * **२३४१९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नद्या असून तेथील पूर परिस्थितीस जबाबदार असलेल्या नद्यांतील गाळ मागील १० ते १२ वर्षांपासून काढलेला नसल्याने पंचगंगा नदीत व इतर नद्यांमध्ये सुमारे साडेपाच लाख घनमीटर गाळ साचलेला असल्यामुळे तेथे पावसाळ्यात पुराचा धोका निर्माण झाला

असल्याचे माहे, मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये उद्भवणाऱ्या पूर परिस्थितीसंदर्भात तसेच पंचगंगा नदी व इतर नद्यांतील गाळ काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५/०७/२०२३ अन्वये नदीतील गाळ निष्कासन करण्याच्या दृष्टीने समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचे अध्यक्ष संबंधित जिल्हाधिकारी आहेत. या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्याच्या समितीने पंचगंगा नदीतील गाळाच्या नजर पाहणीने केलेल्या निरीक्षणानुसार पंचगंगा नदीमध्ये साधारणपणे ५.५० लक्ष घनमीटर इतका गाळ साठला असल्याची शक्यता वर्तविली आहे.
(२) कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा, कडवी, कासारी, भोगावती, पंचगंगा, जांभळी, हिरण्यकेशी, ताम्रपर्णी, घटप्रभा व वेदगंगा इ. नद्यांच्या शहरातून वाहणाऱ्या भागांमध्ये तसेच पूराच्या दृष्टीने महत्वाच्या लांबीमध्ये निळी व लाल पूररेषा निश्चित केली आहे. सदर लांबीमध्ये नदीची वहन क्षमता पुनर्स्थापित करुन पूराचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीने गाळ, राडारोडे, बेटे व अडथळे काढण्यासाठी जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय, दिनांक २५/०७/२०२३ नुसार गाळ काढण्याकरीता आवश्यक बाबींची पूर्तता करुन अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.